# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र. ८२/२०१९/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. देविदास नथु पवार<br>रा. ११०, शिवपार्वती नगर, आयटीआय जवळ, देवपूर, धुळे, ता.जि. धुळे. | सहकार अधिकारी (प्र.श्रे.),<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे, प्रशासकिय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, धुळे, ता.जि. धुळे. | सहायक निबंधक,<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था धुळे, प्रशासकीय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, धुळे, ता.जि. धुळे. |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - १६/०६/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १२/०७/२०१८ | १२/०७/२०१८ | ०६/०८/२०१८<br>०५/१०/२०१८ | १८/०८/२०१८ | १८/०८/२०१८ | ०३/१०/२०१८ |

अपिलार्थी यांनी दि. १७/१२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये " मागणी नुसार माहिती दिली नाही दिलेली माहिती अपुर्ण दिशाभुल करणारी आहे" असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असुन इतर पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

मा. जिल्हा उपनिबंधक सह. संस्था धुळे यांचे पत्र क्र. ६/नापत, मुख्यालय/विविध तक्रार अर्ज सन २०१७ दि. ०२/०४/२०१७ नुसार साई सेवा नागरी सह. पतसंस्था देवपुर, धुळे येथील पतसंस्थेचे दप्तरे बेकायदेशीर पणे गहाळ करणाऱ्या संचालक मंडळावर न्यायालयात खटले दाखल करुन ठेवीदारांच्या ठेवी परत मिळणेबाबत आपल्या कार्यालया कडून आज अखेर केलेल्या कारवाईचे अभिलेखाचे प्रमाणित सत्यप्रत मिळणे.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुचीत केले की, या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. वि-२/ माहितीचा अधिअर्ज/माहिती/सन २०१८ दिनांक ०६/०८/२०१८ अन्वये अवसायकाने संबंधीत पतसंस्थेचा चार्ज मिळणेबाबत कलम ८० अन्वये कार्यवाही केलेली आहे तसेच संचालक मंडळावर कार्यवाही करावी म्हणून अवसायकाने देवपूर पोलिस स्टेशन धुळे यांना लेखी पत्र दिलेले असल्याचे कळवून त्या पत्रांची छायांकित प्रत अर्जदार यांना पुरविण्यात आली आहे.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३/१०/२०१८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यावर उपलब्ध असलेली माहिती अपिलकार यांना पुनश्च पुरविण्यात यावी, असे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढले.

३) त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपिल आदेशात नमुद केल्यानुसार अवसायकाने पुरविलेल्या कागदपत्रावरुन आपणास या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुनश्च पुरविण्यात येत आहे, असे कळविले.

४) सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती दिली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक,

**जावक क्र.** अ०/२२४८ दि. २६/१२/२०२३